नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - ३३२ Issue - 332 | वार गुरूवार दि. २३ एप्रिल २०२६ Blow- Thursday Date 23 April 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## पश्चिम बंगाल आणि तामिळनाडूमध्ये विधानसभेसाठी आज मतदान

### पश्चिम बंगालमध्ये १५२ जागांसाठी तर तामिळनाडूमध्ये २३४ जागांसाठी होणार निवडणूक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीसाठी मतदानाचा पहिला टप्पा २३ एप्रिल रोजी, तर दुसरा टप्पा २९ एप्रिल रोजी पार पडणार आहे. या निवडणुकीत राज्य विधानसभेच्या २९४ जागांसाठी मतदान होणार आहे. तर तमिळनाडूमध्ये विधानसभेच्या २३४ जागांसाठी गुरुवार, २३ एप्रिल रोजी एकाच टप्प्यात निवडणूक होत आहे. मतमोजणी होऊन निकाल ४ मे रोजी जाहीर केला जाईल.

पश्चिम बंगालमध्ये निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यात महत्त्वाच्या नंदीग्राम जागेसह एकूण १५२ मतदारसंघांमध्ये मतदान होईल. निवडणुकीच्या वेळापत्रकानुसार, पहिल्या टप्प्यात उत्तर बंगालमधील कूचबिहार, अलीपूरद्वार, जलपाईगुडी, कालिम्पोंग, दार्जिलिंग, उत्तर आणि दक्षिण दिनाजपूर आणि मालदा, तसेच दक्षिण बंगालमधील मुर्शिदाबाद, बीरभूम, पश्चिम बर्दवान, बांकुरा, पुरुलिया, पश्चिम मेदिनीपूर, पूर्व मेदिनीपूर आणि झाडग्राम यांचा समावेश असेल.

नंदीग्राममध्ये भाजपचे सुवेंदू अधिकारी हे तृणमूल काँग्रेसचे पवित्र कार, काँग्रेसचे उमेदवार सेख जरियातुल हुसेन आणि सीपीआय नेत्या शांती गिरी यांच्या विरोधात लढत आहेत. सुवेंदू अधिकारी यांनी २०२१ मध्ये नंदीग्राम मतदारसंघात टीएमसी प्रमुख ममता बॅनर्जी यांचा पराभव केला होता. २०२१ च्या निवडणुकीत भाजपला मिळालेल्या यशात केंद्रस्थानी असलेल्या उत्तर बंगालमध्ये संपूर्ण मतदान पहिल्याच टप्प्यात होणार आहे. या प्रदेशात विधानसभेच्या ५४ जागा असून, त्या सर्व जागांवर २३ एप्रिल रोजी मतदान होईल. या निवडणुकीत राजकीय पक्षांमध्ये तीव्र लढत पाहायला मिळत असून, मुख्यमंत्री ममता बॅनर्जी १४ वर्षांपासून सत्तेत आहेत. भाजपची प्रतिष्ठा पणाला : पश्चिम बंगालमध्ये सत्ता आणण्यासाठी भाजपने आपली पूर्ण प्रतिष्ठा पणाला लावली असून गेल्या अनेक महिन्यापासून भाजपने या राज्यात मोर्चेबांधणी केलेली आहे. स्वत: पंतप्रधान नरेंद्र मोदींसह केंद्रिय गृहमंत्री अमित शहा व अन्य भाजपचे रथी-महारथी प्रचाराची धुरा सांभाळत आहेत. भाजपने राज्यातील स्थानिक मुद्यांवर आणि विकास विषयावर प्रचार वाढवला आहे.

तामिळनाडूमध्ये विधानसभेसाठी आज मतदान

तमिळनाडूमध्ये २३४ जागांसाठी गुरुवार, २३ एप्रिल रोजी निवडणूक होत आहे. येथे एकूण ५ कोटी ६० लाख मतदार आहेत. तमीळनाडूत 'द्रमुक'प्रणीत 'धर्मनिरपेक्ष पुरोगामी आघाडी'मध्ये काँग्रेस, डावे पक्ष आणि विदुथलाई चिरुथाईगल कात्ची (व्हीसीके) यांचा समावेश आहे. स्टॅलिन यांच्या नेतृत्वाखाली ही आघाडी सलग दुसऱ्यांदा विजय मिळवण्यासाठी प्रयत्नशील आहे. तर एडप्पाडी के. पलानीसामी यांच्या नेतृत्वाखाली 'अण्णा द्रमुक', भाजप आणि पट्टाली मक्कळ कच्ची (पीएमके) यासारखे पक्ष 'राष्ट्रीय लोकशाही आघाडी'तून निवडणूक लढवत आहेत.

तमिळनाडूमध्ये गुरुवारी होणाऱ्या विधानसभा निवडणुकीसाठी सुरक्षेची व्यापक पातळीवर तयारी करण्यात आली आहे. संपूर्ण तमिळनाडूमध्ये सुमारे ७५ हजार ०३२ मतदान केंद्रे उभारण्यात आली आहेत. त्यापैकी ३ हजार ०२२ ठिकाणांवरील ५ हजार ९३८ मतदान केंद्रांना संवेदनशील घोषित करण्यात आले आहे. तमिळनाडूचे राजकारण गेल्या काही दशकांपासून द्रमुक आणि अण्णा द्रमुक याच प्रादेशिक पक्षांभोवती फिरत आले आहे. यंदा २०२६च्या विधानसभा निवडणूक रिंगणात प्रसिद्ध अभिनेता विजयच्या 'तमीळगा वेत्री कळघम' पक्षाने उडी घेतल्याने तिरंगी सामना होईल. विजय यांचा पक्ष तरुण मतदारांना आणि तमीळनाडूतील पारंपरिक राजकारणास कंटाळलेल्या वर्गाला आकर्षित करत असल्याने त्यांच्या पक्षाच्या कामगिरीवर निकाल निश्चित होईल. त्यांचा पक्ष 'द्रमुक' की 'अण्णा द्रमुक'ची मते घेणार, याची उत्सुकता आहे.

'टीव्हीके'मुळे पारंपरिक मतांचे विभाजन? : अभिनेता विजयने आपल्या 'टीव्हीके' पक्षाद्वारे निवडणूक रिंगणात प्रवेश केला. त्यांनी भाजपला वैचारिक शत्रू आणि 'द्रमुक'ला राजकीय शत्रू घोषित करून, स्वतंत्रपणे निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतला. 'टीव्हीके'ने प्रचारात प्रामुख्याने नवमतदार आणि पारंपरिक द्रविडी पक्षांपासून दुरावलेल्या मतदारांना साद घातल्याचे दिसून आले. विजय यांच्या राजकारणातील प्रवेशामुळे पारंपरिक मतांचे विभाजन होऊन विशेषत: 'अण्णा द्रमुक'च्या मतपेढीला फटका बसण्याचा अंदाज वर्तवला जात आहे. तर काही शहरी भागांत 'द्रमुक'च्या मतांमध्येही विभागणी होऊ शकते, ज्यामुळे त्रिशंकू विधानसभेची शक्यताही वर्तवली जात आहे.

भाजपकडून हिंदुत्व आणि राष्ट्रीयत्वावर भर : उत्तर भारतीय पक्ष अशी प्रतिमा असल्याने भाजपसाठी तमिळनाडू हे राज्य नेहमीच आव्हानात्मक ठरले. यंदाच्या निवडणुकीत भाजपचे राज्यात जनाधार वाढवण्यावर भर दिला. 'द्रविडी अस्मिते'च्या राजकारणाला भाजपने हिंदुत्व आणि राष्ट्रीयत्व या मुद्द्यांनी आव्हान देण्याचा प्रयत्न केला.

## बारामती, राहुरी विधानसभा मतदारसंघात पोटनिवडणुकीसाठी आज मतदान



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री व राष्ट्रवादीचे अध्यक्ष अजित पवार यांच्या अपघाती निधनामुळे बारामती आणि भाजपचे आमदार शिवाजी कर्डिले यांच्या निधनामुळे राहुरी विधानसभेच्या जागा रिक्त झाल्या आहेत. बारामतीत अजित पवार यांच्या पत्नी आणि राज्याच्या पहिल्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार रिंगणात आहेत. राहुरीच्या जागेवर शिवाजी कर्डिले यांचे पुत्र अक्षय कर्डिले हे निवडणूक रिंगणात आहेत.

बारामतीच्या जागेसाठी होणारी पोटनिवडणूक ही बिनविरोध व्हावी यासाठी सर्वांनीच प्रयत्न केले पण काँग्रेसने ही जागा लढवणार असल्याचा चंग बांधला होता. पण नंतर या येथे उभे असलेल्या उमेदवाराने आपला अर्ज मागे घेतला आहे. राहुरीच्या जागेसाठी २२ उमेदवारांनी आपला उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत.

बारामती विधानसभा मतदारसंघातील पोटनिवडणूक आता अनपेक्षितपणे रंगतदार व चुरशीची होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. सुरुवातीला ही निवडणूक बिनविरोध होईल, असा अंदाज व्यक्त केला जात होता. मात्र, प्रत्यक्षात तब्बल ५५ उमेदवारांनी अर्ज दाखल केल्याने राजकीय समीकरणे पूर्णपणे बदलली आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवार सुनेत्रा पवार यांच्यासाठी ही निवडणूक आता तितकी सोपी राहिलेली नाही. सहानुभूतीची लाट मिळेल आणि विरोधक मागे हटतील, अशी अपेक्षा होती. पण मोठ्या संख्येने उमेदवार मैदानात उतरल्यामुळे लढत अधिकच कठीण बनली आहे. अजित पवार यांच्या निधनानंतर बारामतीतील राजकीय वारसा टिकवण्यासाठी सुनेत्रा पवार यांनी सक्रिय पावले उचलली. त्यांनी राज्यसभेच्या खासदारकीचा राजीनामा देत राज्याच्या राजकारणात थेट प्रवेश केला. त्यानंतर उपमुख्यमंत्रीपदाची जबाबदारी स्वीकारत त्यांनी बारामतीतील रिक्त जागेसाठी पोटनिवडणूक लढण्याचा निर्णय घेतला.

या पोटनिवडणुकीसाठी गुरुवारी, २३ एप्रिल रोजी मतदान होणार आहे, तर ४ मे रोजी निकाल जाहीर होणार आहे. या निवडणुकीत धनंजय मुंडे यांच्या पत्नी करुणा मुंडे आणि 'बिग बॉस'मधील माजी स्पर्धक अभिजित बिचुकले यांनीही उमेदवारी अर्ज भरला आहे. बारामती पोटनिवडणूक आता केवळ औपचारिकता न राहता एक मोठी राजकीय लढत ठरणार आहे. विविध पक्ष, अपक्ष उमेदवार आणि स्थानिक मुद्दे यामुळे ही निवडणूक राज्याच्या राजकारणात विशेष लक्ष वेधून घेणारी ठरणार आहे.

भाजपने दिवंगत शिवाजी कर्डिले यांचे पुत्र अक्षय कर्डिले यांच्यावर विश्वास दाखवत राहुरी विधानसभा पोटनिवडणुकीसाठी त्यांना उमेदवारी दिली आहे. त्यांच्या विरोधात तब्बल २२ इच्छुकांनी अर्ज दाखल केले आहेत. राष्ट्रवादीप्रमणेच वंचित बहुजन आघाडीनेही शेवटच्या क्षणी उमेदवार बदलत देवळाली प्रवराचे नगरसेवक संतोष चोळके यांना रिंगणात उतरवले आहे. याशिवाय शिवसेना (उबाठा) गटाचे जिल्हाप्रमुख रावसाहेब खेवरे, शिंदे गटाचे रवींद्र मोरे तसेच सविता राजेंद्र शेटे यांनी अपक्ष म्हणून उमेदवारी अर्ज दाखल करून लढतीत रंग भरला आहे.

बारामती आणि राहुरी पोटनिवडणुकीसाठी मतदान यंत्रे (ईव्हीएम), व्हीव्हीपॅट, प्रशिक्षित निवडणूक कर्मचारी तसेच पोलिस बंदोबस्ताची व्यवस्था करण्यात आली आहे. सर्व मतदान केंद्रांवर वेबकास्टिंगची सोय, कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी सीसीटीव्ही यंत्रणा तसेच विविध तपासणी पथकांची नियुक्ती करण्यात आली आहे. आदर्श आचारसंहितेची काटेकोर अंमलबजावणी करून निवडणूक प्रक्रिया पारदर्शकपणे पार पाडण्यासाठी प्रशासन सज्ज आहे.

## मालेगाव बॉम्बस्फोट खटल्यातील चारही आरोपींची पुराव्याअभावी निर्दोष मुक्तता

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : २००६ मधील बहुचर्चित आणि संवेदनशील असलेल्या मालेगाव साखळी बॉम्बस्फोट प्रकरणातील चार आरोपींना मुंबई उच्च न्यायालयाने मोठा दिलासा दिला आहे. पुराव्यांच्या अभावामुळे या चौघांविरुद्धचे दोषारोप न्यायालयाने रद्द केले असून, त्यांना या प्रकरणातून मुक्त करण्याचे आदेश दिले आहेत. या निर्णयामुळे संबंधित आरोपींवरील खटल्याची प्रक्रिया आता संपुष्टात आली आहे.

८ सप्टेंबर २००६ रोजी मालेगावमध्ये शब-ए-बारातच्या दिवशी मशिदीजवळ भीषण साखळी बॉम्बस्फोट झाले होते. या दुर्दैवी घटनेत ३७ निष्पाप नागरिकांचा मृत्यू झाला होता, तर शेकडो लोक गंभीर जखमी झाले होते. सुरुवातीला या प्रकरणाचा तपास एटीएसकडून करण्यात आला होता आणि त्यात ९ जणांना अटक करण्यात आली होती. त्यानंतर सीबीआयनेही या तपासाला दुजोरा दिला होता. मात्र, नंतरच्या काळात एनआयएकडे हे प्रकरण सोपवण्यात आले होते. उच्च न्यायालयाने ज्या चार आरोपींवरील दोषारोप रद्द केले आहेत, त्यात लोकेश शर्मा, धन सिंह, राजेंद्र चौधरी आणि मनोहर नरवारिया यांचा समावेश आहे. याआधीही याच प्रकरणातील ११ जणांना पुराव्याअभावी न्यायालयाने दोषमुक्त केले होते. आता या चौघांविरुद्धचे आरोपपत्रही न्यायालयाने रद्द केल्याने त्यांच्या सुटकेचा मार्ग मोकळा झाला आहे. न्यायालयाच्या या निर्णयामुळे आता तपास यंत्रणांसमोर मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. या प्रकरणातील अन्य आरोपी नूरुल हुदा याने या निर्णयावर प्रश्न उपस्थित केले असून, आता एनआयए या निर्णयाविरुद्ध पुन्हा दाद मागणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. अद्याप तपास यंत्रणेकडून यावर कोणतीही अधिकृत प्रतिक्रिया देण्यात आलेली नाही. २००६ च्या या बॉम्बस्फोटातील पीडितांसाठी आणि न्यायव्यवस्थेसाठी हा एक अत्यंत महत्त्वाचा आणि मोठा कायदेशीर टप्पा मानला जात आहे.

## राज्यात पुढील चार दिवस वादळी वाऱ्यासह पावसाचा इशारा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे/ सातारा : महाराष्ट्रात पुढील चार दिवसात वादळी वाऱ्यासह पाऊस आणि गारपीट होण्याची शक्यता असल्याचं पुण्यातील हवामान शास्त्रज्ञ एस.डी. सानप यांनी सांगितलं आहे. ते एबीपी माझासोबत बोलत होते. राज्यात आजपासून पुढील ४ दिवस दक्षिण विदर्भ,मराठवाडा मध्य महाराष्ट्राला पावसाचा यलो अलर्ट असल्याचं सानप यांनी सांगितलं. दुसरीकडे साताऱ्यात आणि पुण्यात मुसळधार पाऊस आणि गारपीट झाली आहे. सातारा शहरात आणि ग्रामीण भागात पावसानं हजेरी लावली. उकाड्यामुळं त्रस्त झालेल्यांनी या पावसात भिजण्याचा आनंद घेतला.



हवामान शास्त्रज्ञ एस. डी. सानप यांनी दिलेल्या माहितीनुसार आजपासून पुढील ४ दिवस पावसाचे असतील, याकाळात वादळी वाऱ्यासह गारपीटही होण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. दक्षिण मध्य महाराष्ट्र,विदर्भ, मराठवाड्यातील काही जिल्ह्यात वादळी वाऱ्यासह गारपीट होण्याची शक्यता असल्याचं सानप यांनी सांगितलं.

भारतीय हवामान विभागानं आजपासून पुढील ४ दिवस दक्षिण विदर्भ,मराठवाडा मध्य महाराष्ट्राला पावसाचा यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. या भागात वादळी पाऊस होणार असल्याचा अंदाज पुणे हवामान विभागानं वर्तवला आहे. हवामान विभागानं सांगली, सोलापूर, सातारा, धाराशिव,लातूर, परभणी,बीड चंद्रपूर,यवतमाळमधील नागरिकांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

### रोजगार क्षमतेत होणार वाढ; मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली माहिती

## महाराष्ट्रात ₹२.५६ लाख कोटींची गुंतवणूक आणि एक लाखांहून अधिक रोजगारनिर्मितीचे लक्ष्य

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यात मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक आकर्षित करून रोजगारनिर्मितीला चालना देण्यासाठी तब्बल ₹२,५६,१३७.०१ कोटींच्या अठरा विशाल व अतिविशाल प्रकल्पांना विशेष प्रोत्साहन देण्यास मान्यता देण्यात आली. यामुळे सुमारे एक लाखांहून अधिक प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगारनिर्मिती होणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभागाच्या मंत्रिमंडळ उपसमितीची चौदावी बैठक झाली. बैठकीस उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उद्योग व मराठी भाषा मंत्री डॉ.उदय सामंत, ऊर्जा विभागाच्या अपर मुख्य सचिव आभा शुक्ला, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ.पी.गुप्ता, उद्योग विभागाचे प्रधान सचिव डॉ. पी.अन्बळगन, एमआयडीसीचे मुख्य कार्यकारी अधिकारी पी.वेलारासू तसेच विकास आयुक्त दिपेंद्रसिंह कुशवाह उपस्थित होते.

या बैठकीमध्ये थ्रस्ट सेक्टर तथा उच्च तंत्रज्ञानावर आधारित सोलर सेल, मॉडयुल, इग्नॉट, वेफर्स, ग्रीन स्टील, हरित अमोनिया, इलेक्ट्रॉनिक्स उत्पादने, अवकाश व संरक्षण साहित्य, लिथियम आयन बैटरी, इलेक्ट्रीक वाहन निर्मिती/साहित्य, स्टील व गॅस टू केमिकल निर्मितीचे विशाल व अतिविशाल प्रकल्पांना विशेष प्रोत्साहने मंजूर करण्यासाठीच्या १८ प्रस्तावांना मुख्यमंत्री फडणवीस यांनी मान्यता दिली.

यामध्ये नाशिकमधील व्हर्च्युओसो कॉम्प्रेसर्स प्रा. लि. आठशे कोटींची गुंतवणूक करून पाचशे जणांना रोजगार देणार आहे. अमरावती येथे टेंबो डिफेन्स प्रोडक्ट प्रा. लि.एक हजार कोटींची गुंतवणूक करत आहे.

तर छत्रपती संभाजीनगरमधील नायडेक ग्लोबल अप्लायन्सेस इंडिया प्रा. लि. एक हजार कोटींची गुंतवणूक करून एक हजार नवीन रोजगार निर्माण करेल.पुण्याच्या शिरूर भागात जबिल सर्किट इंडिया प्रा. लि. पंधराशे कोटींच्या गुंतवणुकीतून तीन हजार लोकांना संधी देणार आहे.

गडचिरोली सारख्या नक्षलग्रस्त भागात हरिओम पाईप इंडस्ट्रीज लि. ३,१३५ कोटींची गुंतवणूक करून आठ हजार जणांना रोजगार देणार आहे.अहिल्यानगरमध्ये निबे स्पेस चार हजार कोटींच्या गुंतवणुकीसह एक हजार रोजगार निर्माण करेल.

पुण्याच्या तळेगाव भागात युरोबस इंडिया प्रा. लि. ४२०० कोटींची गुंतवणूक आणि १२ हजर रोजगार निर्मिती करेल. चंद्रपूरमध्ये मिलीयन स्टील प्रा. लि. २५६.०१ कोटींच्या गुंतवणुकीतून ३६० रोजगार देणार आहे.

भंडारा जिल्ह्यात अशोक लेलँड लि. दहा हजार कोटींची मोठी गुंतवणूक करून एक हजार रोजगार उपलब्ध करेल. नागपूरच्या बुटीबोरी येथे अॅकमे क्लीनटेक सोल्युशन प्रा.लि. ११,४०० कोटींची गुंतवणूक



आणि सात हजार रोजगार निर्माण करेल.तर याच कंपनीचा रायगड/पालघरमधील ग्रीन स्टील प्रकल्प अकरा हजार कोटींची गुंतवणूक आणि २५०० रोजगार देईल.

नागपूरमधील सोलार डिफेन्स अँड एरोस्पेस लि. १२,७८० कोटींच्या गुंतवणुकीतून ६८२५ जणांना काम देणार आहे. ग्लोब फोर्ज लिमिटेड, अहिल्यानगर आणि धाराशिवमध्ये १५,४३० कोटींची गुंतवणूक करून ३६०० रोजगार निर्माण करेल. रायगड येथे बालासोर अलॉयज १७,४७९ कोटींची गुंतवणूक आणि ३३२०० रोजगार देणार आहे. छत्रपती संभाजीनगरमध्ये गोदावरी न्यु एनर्जी प्रा. लि. २७,५१५ कोटींची गुंतवणूक करून चार हजार रोजगार निर्माण करेल. रायगड/पालघरमध्ये अॅकमे क्लीनटेक प्रा.लि.चा ग्रीन अमोनिया प्रकल्प ३७,८०० कोटींची गुंतवणूक आणि ४५०० रोजगार घेऊन येत आहे. गडचिरोलीत रश्मी मेटलर्जिकल इंडस्ट्री प्रा. लि. ४० हजार कोटींची भव्य गुंतवणूक आणि २० हजार रोजगार निर्माण करेल. सर्वात मोठी गुंतवणूक एस्सार एक्सप्लोरेशन अँड प्रोडक्शन लि. कडून रायगडमध्ये ५६,८५२ कोटींच्या रूपात होणार असून, त्यातून २५ हजार जणांना रोजगार मिळणार आहे.

या प्रकल्पांमुळे कोकण, विदर्भ, मराठवाडा आणि राज्यातील इतर भागांत औद्योगिक विकासाला मोठी चालना मिळणार असून स्थानिक अर्थव्यवस्थेला बळकटी मिळेल. तसेच तांत्रिक नवकल्पना, संशोधन-विकास आणि मजबूत पुरवठा साखळी निर्माण होण्यास मदत होईल. सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांनाही याचा लाभ होणार आहे. याशिवाय, स्थानिक कामगारांसाठी प्रशिक्षण व कौशल्यविकासाच्या संधी उपलब्ध होऊन त्यांच्या रोजगारक्षमतेत वाढ होणार आहे.

## संपादकीय....

### धूमशान

पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीसाठी मतदानाचा पहिला टप्पा २३ एप्रिल रोजी, तर दुसरा टप्पा २९ एप्रिल रोजी पार पडणार आहे. या निवडणुकीत राज्य विधानसभेच्या २९४ जागांसाठी मतदान होणार आहे. तर तमिळनाडूमध्ये विधानसभेच्या २३४ जागांसाठी गुरुवार, २३ एप्रिल रोजी एकाच टप्प्यात निवडणूक होत आहे. मतमोजणी होऊन निकाल ४ मे रोजी जाहीर केला जाईल. पश्चिम बंगालमध्ये निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यात महत्त्वाच्या नंदीग्राम जागेसह एकूण १५२ मतदारसंघांमध्ये मतदान होईल. निवडणुकीच्या वेळापत्रकानुसार, पहिल्या टप्प्यात उत्तर बंगालमधील कूचबिहार, अलीपूरद्वार, जलपाईगुडी, कालिम्पोंग, दार्जिलिंग, उत्तर आणि दक्षिण दिनाजपूर आणि मालदा, तसेच दक्षिण बंगालमधील मुर्शिदाबाद, बीरभूम, पश्चिम बर्दवान, बांकुरा, पुरुलिया, पश्चिम मेदिनीपूर, पूर्व मेदिनीपूर आणि झाडग्राम यांचा समावेश असेल. नंदीग्राममध्ये भाजपचे सुवेंदू अधिकारी हे तृणमूल काँग्रेसचे पवित्र कार, काँग्रेसचे उमेदवार सेख जरियातुल हुसेन आणि सीपीआय नेत्या शांती गिरी यांच्या विरोधात लढत आहेत. सुवेंदू अधिकारी यांनी २०२१ मध्ये नंदीग्राम मतदारसंघात टीएमसी प्रमुख ममता बॅनर्जी यांचा पराभव केला होता. २०२१ च्या निवडणुकीत भाजपला मिळालेल्या यशात केंद्रस्थानी असलेल्या उत्तर बंगालमध्ये संपूर्ण मतदान पहिल्याच टप्प्यात होणार आहे. या प्रदेशात विधानसभेच्या ५४ जागा असून, त्या सर्व जागांवर २३ एप्रिल रोजी मतदान होईल. या निवडणुकीत राजकीय पक्षांमध्ये तीव्र लढत पाहायला मिळत असून, मुख्यमंत्री ममता बॅनर्जी १४ वर्षांपासून सत्तेत आहेत. भाजपची प्रतिष्ठा पणाला : पश्चिम बंगालमध्ये सत्ता आणण्यासाठी भाजपने आपली पूर्ण प्रतिष्ठा पणाला लावली असून गेल्या अनेक महिन्यापासून भाजप-ने या राज्यात मोर्चेबांधणी केलेली आहे. स्वत: पंतप्रधान नरेंद्र मोदींसह केंद्रिय गृहमंत्री अमित शहा व अन्य भाजप-चे रथी-महारथी प्रचाराची धुरा सांभाळत आहेत. भाजपने राज्यातील स्थानिक मुद्द्यांवर आणि विकास विषयावर प्रचार वाढवला आहे. तमिळनाडूमध्ये २३४ जागांसाठी गुरुवार, २३ एप्रिल रोजी निवडणूक होत आहे. येथे एकूण ५ कोटी ६० लाख मतदार आहेत. तमीळनाडूत 'द्रमुक'प्रणीत 'धर्मनिरपेक्ष पुरोगामी आघाडी'मध्ये काँग्रेस, डावे पक्ष आणि विदुथलाई चिरुथाईगल कात्ची (व्हीसीके) यांचा समावेश आहे. स्टॅलिन यांच्या नेतृत्वाखाली ही आघाडी सलग दुसऱ्यांदा विजय मिळवण्यासाठी प्रयत्नशील आहे. तर एडप्पाडी के. पलानीसामी यांच्या नेतृत्वाखाली 'अण्णा द्रमुक', भाजप आणि पट्टाली मक्कळ कच्ची (पीएमके) यासारखे पक्ष 'राष्ट्रीय लोकशाही आघाडी'तून निवडणूक लढवत आहेत.

# कौशल्याच्या संधी : रोजगाराच्या हमी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

महाराष्ट्रातील ग्रामीण भागाकडून शहरांकडे होणारे स्थलांतराचे प्रमाण कमी व्हावे, यास्तव ग्रामीण भागातील युवकांना स्थानिक ठिकाणी कौशल्य विकास प्रशिक्षण देऊन रोजगारक्षम बनविण्याच्या उद्देशाने प्रमोद महाजन ग्रामीण कौशल्य विकास केंद्र ही योजना राबविण्यात येत आहे. ग्रामीण भागातील तरुणांना आधुनिक कौशल्य प्रशिक्षण देणे, रोजगार व उद्योजकता वाढवणे, स्थानीय उद्योगांना प्रशिक्षित मनुष्यबळ उपलब्ध करून देणे हा या योजनेचा उद्देश आहे.

या योजनेअंतर्गत कौशल्य विकासाचे उमेदवारांना ३ ते ६ महिन्याचे अल्प मुदतीचे मोफत प्रशिक्षण देण्यात येते. यामध्ये डिजीटल मित्र, मेडीकल रेकार्ड असिटंट, इलेक्ट्रेशियन, जुनियर ज्वलेरी डिझायनर, वेब डेव्हलव्पर, सोशियल मिडीया इन्फ्लयूंसर आदीबाबत प्रशिक्षण देण्यात येते.

या प्रशिक्षणाकरिता उमेदवारांचे शैक्षणिक पात्र १० वी १२ वी, पदविका, पदवी (प्रत्येक अभ्यासक्रम निहाय वेगवेगळी असेल). १८ ते ४५ युवक-युवतींसाठी वयोगटातील उमेदवार असावे. आधारकार्ड, शैक्षणिक पात्रतेनुसार प्रमाणपत्रांची आवश्यकता आहे. अभ्यासक्रम पूर्ण झाल्यानंतर शासनामार्फत प्रमाणपत्र देण्यात येते तसेच व्यवसाय करण्यासाठी उमेदवारांना प्रमाणपत्राच्या बँकेकडून कर्ज मिळते. कौशल्य विकास प्रशिक्षण संबंधित सर्व बाबी र्हींींि://ज्ञरींह-रश्रूर.ारहीुरूरा.सीं.ळप/ या वेबसाईटवर ऑनलाईन उपलब्ध आहेत, तसेच अधिक माहितीसाठी या कार्यालयाच्या दुरध्वनी क्रमांक ०२०-२६१३३६०६ वर संपर्क साधावा.

प्रशिक्षणामुळे बदललेले अक्षदाचे जीवन

ग्रामीण भागातील युवक-युवतींना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे आणि त्यांना स्वावलंबी बनविणे ही आजच्या काळातील अत्यंत गरजेची बाब आहे. आर्थिक अडचणी, अपुरी कौशल्ये आणि मर्यादित संधी यामुळे अनेक तरुणांना आपल्या क्षमतेनुसार प्रगती करता येत नाही. अशा परिस्थितीत शासनाच्या विविध कौशल्य विकास योजनांमुळे ग्रामीण युवकांना नवे आयाम मिळत आहेत. प्रमोद महाजन ग्रामीण कौशल्य विकास केंद्र ही योजना त्यापैकी एक महत्त्वपूर्ण उपक्रम असून, मोफत प्रशिक्षणाच्या माध्यमातून युवकांना रोजगारक्षम बनविण्याचे काम करते. या योजनेचा लाभ घेत आळेफाटा येथील अक्षदा प्रितम मोढवे हिने आपल्या आयुष्यात सकारात्मक बदल घडवून आणला असून तिची यशोगाथा इतरांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

आळेफाटा येथील अक्षदा प्रितम मोढवे हिच्या जीवनात प्रशिक्षणापूर्वी विविध अडचणींना सामोरे जावे लागत होते. त्याचे पतीही पेट्रोल पंपांवर मजुर म्हणून काम करीत होते. त्यामुळे उत्पन्न मर्यादित असल्याने कुटुंबाची आर्थिक परिस्थिती हालाखिची होती, कुटुंबाचे आर्थिक उत्पन्न वाढविण्यासाठी ते धडपड होते. अशातच प्रमोद महाजन ग्रामीण कौशल्य विकास केंद्राअंतर्गत आस्था फाउंडेशनमार्फत जनरल ड्युटी असिस्टंट (जीडीए) अभ्यासक्रमासाठी देण्यात येणाऱ्या प्रशिक्षणात तिला मूलभूत नर्सिंग कौशल्ये, रुग्णांची काळजी, रुग्णालयीन शिस्त, कक्षाचे व्यवस्थापनाचे उत्तम मार्गदर्शन मिळाले. प्रशिक्षण उत्तीर्ण झाल्यानंतर आस्था फाउंडेशनने तिला सिग्मा कर्करोग रुग्णालयात नोकरीची संधी उपलब्ध करून दिली. तिची मेहनत आणि चिकाटीने ती लवकरच कामामध्ये स्थिरावली.प्रशिक्षणाने तिच्या आयुष्यात परिवर्तन होण्यास सुरुवात झाली, सहा महिने होताच तिची परिस्थिती सुधारु लागली.आज तिला महिन्याला १५ रुपये पगार मिळतो आणि तिचे पतीही पुणे शहरात टॅक्सी चालवून ते आपल्या कुटुंबाचे सक्षमपणे उदरनिर्वाह करीत आहेत. तसेच सद्या मोढवे ही जीएनएम अभ्यासक्रमास प्रवेश घेऊन पुढील शिक्षण पूर्ण करीत जाहे.

सुरेश वराडे, सहायक आयुक्त, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र: कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाचे माध्यमातून जिल्हा कार्यालयामार्फत विविध कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रम, कार्य प्रशिक्षण योजना जसे की मुख्यमंत्री युवा कार्यप्रशिक्षण व प्रधानमंत्री इंटर्नशिप योजना व रोजगार मेळावे या योजना निशुल्क राबविण्यात येत आहेत. जिल्ह्यातील जास्तीत जास्त रोजगार इच्छुक उमेदवारांनी कौशल्य विकास प्रशिक्षण, कार्य प्रशिक्षण व रोजगार मेळावे या विविध योजनांचा लाभ घ्यावा.

अक्षदा प्रितम मोढवे : जीडीए प्रशिक्षणामुळे माझ्या आयुष्याला नवी दिशा मिळाली. मी आज स्वतंत्रपणे काम करीत असून माझ्यामध्ये आत्मविश्वास निर्माण झाला आहे. माझे कुटुंब सुरक्षित आहे. प्रमोद महाजन ग्रामीण कौशल्य विकास केंद्राअंतर्गत आस्था फाउंडेशनने दिलेल्या संधीमुळे आमचे आयुष्य खरोखर बदलले आहे.

**संकलन : जिल्हा माहिती कार्यालय, पुणे**

# परीट समाजाच्या उच्चशिक्षित वधू-वरांचा नाशिकला मेळावा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : महाराष्ट्र परिट/धोबी सेवा मंडळ व परीट समाज यांच्या संयुक्त विद्यमाने नाशिकमध्ये प्रथमच उच्च शिक्षितांसाठी वधू-वर परिचय एक इलाईट स्नेहभेट

रविवार, २६ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ९ ते सायं. ५ वा.हॉटेल कालिटी इन, विजय-ममत्ता थिएटर शेजारी,पुणे रोड, नाशिक येथे आयोजित करण्यात आले आहे.

पारंपारीक व आधुनिकतेची जोड असलेले या कार्यक्रमात समाज बांधवांनी मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन संयोजन समितीच्या वतीने करण्यात आले आहे यामध्ये

M.., M.Com., M.Sc., B.E., M.E., M.S., M.Tech., M.C.A., M.C.M. C.A., M. Pharm. All Doctors, LLB, LLM, MBA, Ph.D. धारक विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदवावा पालकांसाठी स्वतंत्र बैठक व्यवस्था करण्यात आली आहे या कार्यक्रमात सहभागी येतांना २ फोटो आणावे. कार्यक्रमात प्रत्यक्ष फॉर्म भरणे आवश्यक आहे. संपूर्ण माहिती असलेला बायोडाटा जमा करावा. कार्यक्रमाचा मुख्य भर वधु-वर व पालक परिचयासाठी असणार आहे.कार्यक्रम नियोजित वेळे-वर नुसार पार पडेल. दि.२२ एप्रिल पर्यंत आपला प्रवेश निश्चित करावा, यासाठी संपर्क विजय शिरसाट ९४२२२ ५९१६५, कैलास देवरे. ९४२१५०९४२९, संतोष निकम ७७६८८८२०००, यांच्याशी संपर्क करावा असे आव्हान करण्यात आले आहे.

# प्रताप माने सर होणार महात्मा ज्योतिबा फुले शिक्षकरत्न पुरस्काराने सन्मानित

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



लातूर प्रतिनिधी /सुधाकर रणदिवे : बाभळगाव येथील आदर्श व कर्तव्यदक्ष शिक्षक प्रताप प्रकाशराव माने सर हे दयानंद विद्यालय बाभळगाव येथे शिक्षक म्हणून कार्यरत आहेत.विद्यार्थ्यांना अडी अडचणींना धावून जाणारे सर म्हणून सर्वत्र त्यांचे कौतुक केले जाते .सरांचे सामाजिक, शैक्षणिक सांस्कृतिक धार्मिक कार्य पाहूनच या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे. गोरगरीब मुलींच्या लग्नासाठी सहकार्य तसेच विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप,याच बरोबर होतकरु तरुण विद्यार्थी यांना मार्गदर्शन इत्यादी सामाजिक कार्यामुळे महाराष्ट्र पोलीस मित्र सोशल असोसिएशन च्या वतीने देण्यात येणारा अत्यंत सन्मानाचा राज्यस्तरीय क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले शिक्षकरत्न पुरस्काराने गौरविण्यात येणार आहे.या पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन व सत्कार करण्यात येत आ-हेत.

# कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयात सांस्कृतिक महोत्सव पारितोषिक वितरण समारंभ संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : रयत शिक्षण संस्थेच्या येथील कर्मवीर भाऊराव पाटील स्वायत्त महाविद्यालयात सांस्कृतिक, कला व वायय महोत्सव स्पर्धेच्या पारितोषिक वितरण समारंभाचा उत्साहपूर्ण कार्यक्रम अलीकडेच संपन्न झाला. या कार्यक्रमास सुप्रसिद्ध चित्रकार व साहित्यिक प्रा. डॉ. संजय साठे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते, तर अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. टी. जाधव हे होते.



कार्यक्रमाच्या सुरुवातीस सांस्कृतिक विभाग प्रमुख व विद्यार्थी कल्याण अधिष्ठाता डॉ. रमेश शिंदे यांनी प्रास्ताविक केले. यावेळी त्यांनी प्रमुख पाहुणे व अध्यक्ष यांचा परिचय करून स्वागत केले. यावेळी मंचावर पदव्युत्तर पदवी विभागाचे अधिष्ठाता डॉ. बाळासाहेब बळवंत, कला विभागाचे अधिष्ठाता डॉ. समाधान माने, वाणिज्य विभागाचे उपप्राचार्य डॉ. सुशील शिंदे तसेच प्रा. सागर नाईक नवरे, प्रा. सचिन सूर्यवंशी आदी मान्यवर उपस्थित होते.

प्रमुख पाहुणे प्रा. डॉ. संजय साठे यांनी आपल्या भाषणात सांगितले की, मानवी जीवनात मिळणाऱ्या छोट्या संधींचे परिणाम भविष्यात मोठे असतात. जीवनातील आनंद हा छोट्या गोष्टींतून शोधावा लागतो.

कला माणसाला जगण्याचे बळ देते आणि ताण-तणावावर मात करण्यास मदत करते. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांना कला जोपासण्याचे आवाहन करत जगाकडे सकारात्मक दृष्टीने पाहण्याचा संदेश दिला.



अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. बी. टी. जाधव यांनी महोत्सवाचे महत्त्व स्पष्ट करताना सांगितले की, विद्यार्थ्यांमधील कलागुणांना वाव देणे, त्यांचे कौशल्य विकसित करणे आणि कलेचे व्यवसायात रूपांतर करण्याच्या दृष्टीने या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला असून भविष्यात याच विद्यार्थ्यांतून साहित्यिक, कलाकार, संगीतकार व अभिनेते घडतील असा विश्वास ही त्यांनी यावेळेस व्यक्त केला.

या महोत्सवात महाविद्यालयातील २२ सांस्कृतिक क्लबमधील सुमारे ५५० हून अधिक विद्यार्थी कलाकारांनी सहभाग नोंदविला.

विविध २२ कला प्रकारांमध्ये स्पर्धा खेळीमेळीच्या वातावरणात पार पडल्या. स्पर्धेत यशस्वी ठरलेल्या विद्यार्थी कलाकारांचा मान्यवरांच्या हस्ते चषक, गुलाबपुष्प व प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला.

हा महोत्सव विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रेरणादायी ठरला.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. भारती सुडके व प्रा. सारिका भांगे यांनी केले, तर आभार प्रदर्शन युवा महोत्सव समितीचे प्रमुख प्रा. मारुती नायकू यांनी मानले.

## जिल्हा परिषदेचे मुख्याध्यापक व शिक्षकांवर सर्व स्तरातून अभिनंदन कौतुकाचा वर्षाव

# नळदुर्ग येथे जिल्हा परिषद प्राथमिक स्पेशल शाळेत विद्यार्थ्यांचा दहा तास अभ्यास करून महामानवला अभिवादन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नळदुर्ग/दादासाहेब बनसोडे : भारतीय घटनेचे शिल्पकार भारतरत्न महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचार धारेवर समता स्वतंत्र बंधुता आणि न्याय समानता आणि अखंडता देणाऱ्या महामानवाला म्हणजेच डॉ बाबासाहेब आंबेडकरांना नळदूर्ग येथे जिल्हा परिषद प्राथमिक स्पेशल शाळेत सतत दहा तास अभ्यास करून अभिवादन करण्यात आले .

विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीच्या निमित्ताने जिल्हा परिषद प्राथमिक शाळा





नळदुर्ग येथे विद्यार्थ्यांमध्ये इंग्रजी विषयाबद्दल चेतना निर्माण करून अनेक विद्यार्थ्यांनी इंग्रजी मधून डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या जिवनावर भाषणे केली त्याचबरोबर विद्यार्थाना शालेय उपयोगी वस्तूचे वाटप करण्यात आले या उपक्रमामुळे जिल्हा परिषद प्राथमिक स्पेशल शाळा मुख्याध्यापक अशी एक यु एसव सहशिक्षिका सुलक्षणा टिळक यांचे सर्व स्तरातून कौतुक व अभिनंदन होत आहे कारण नळदुर्ग येथे जिल्हा परिषद प्राथमिक स्पेशल शाळे मध्ये आज तागायत पहिलाच उपक्रम राबवल्यामुळे शिक्षकावर कौतुकाचा वर्षाव होत आहे

प्रथमता तथागत भगवान गौतम बुद्ध परमपूज्य बोधिसत्व महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमा पूजन करण्यात आले यावेळी नळदुर्ग येथील बौद्धाचार्य दादासाहेब बनसोडे यांनी सर्वांना त्रिशरण पंचशील दिले व मार्गदर्शन केले

यावेळी शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष पल्लवी बनसोडे, शैलेश शिलवंत, श्वेत शिलवंत, शालवी शिलवंत, मनीषा सुरवसे, गोकर्णा सुरवसे, इंदुमती भोसले , भारतबाई सोनवणे , तो तुळसाबाई गायकवाड, सुजाता कांबळे, सोनाली सुरवसे, नानिमा कांबळे, खुशाल बनसोडे, पुष्पा सोनवणे मुख्यमंत्री योजनेतील माजी प्रशिक्षणार्थी प्रेरणा सुरवसे सह बौद्ध उपासक उपासिका मोठ्या संख्येने उपस्थित होत्या आलेल्या सर्व मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना शालेय उपयोगी वस्तूचे वाटप करण्यात आले. तसेच प्रेरणा सुरवसे यांच्याकडून उपस्थित खीर दान करण्यात आले कार्यक्रमाचे प्रास्ताविक शाळेतील सहशिक्षिका सुलक्षणात टिळक यांनी केले शेवटी आभार मुख्याध्यापक शेख यु. एस. यांनी मानले .

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# सांगोला तालुक्यात निसर्गाचा कोप; जोरदार गारपिटीने पिकांचे नुकसान; बळीराजा हतबल

## राजुरी, जुनोनी, कोळा, गौडवाडी परिसरात दीड तास दगडासारखा गारांचा पाऊस; आ. डॉ. बाबासाहेब देशमुख यांनी केली पाहणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सांगोला(तालुका प्रतिनिधी):- सांगोला तालुक्यातील राजुरी, जुनोनी, कोळा, गौडवाडी आदी गावात निसर्गाचा मोठा कोप झाला असून परिसराला जोरदार गारपिटीने झोडपून काढले. कोळा ,नाझरे सर्कलमध्ये सुमारे दीड तास दगडासारख्या गारांचा पाऊस झाला. या भागातील आंबा, डाळिंब, गहू ,ज्वारी इत्यादी पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्यामुळे काढणीला आलेला हंगाम डोळ्यादेखत उद्ध्वस्त झाला आहे.याची तातडीने दखल घेत आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख यांनी तालुका कृषी अधिकारी दिपाली जाधव, तहसीलदार बाळूताई भागवत या अधिकार्यासह नुकसान ग्रस्त शेतकर्यांच्या बांधावर जाऊन नुकसानग्रस्त भागाची पाहणी केली. शासनाने तातडीने पंचनामे करून भरघोस मदत करावी अशी मागणी आमदार बाबासाहेब देशमुख यांनी शासनाकडे केली आहे. विधानसभेत






प्रश्न उपस्थित करून मदत लवकरात लवकर मिळण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी आवर्जून सांगितले. आमदार बाबासाहेब देशमुख व सदस्य नुकसानग्रस्त शेतकर्यांच्या बांधावर जाऊन दौरा केल्याने जनतेतून शेतकरी वर्गाकडून कौतुक होत आहे.

गेल्या वर्षी शेतकर्यांनी डाळिंब, आंबा, गव्हाचे विक्रमी पीक घेतले आहे, मात्र यंदा गाराच्या पावसाने गाठल्याने उभी पिके आडवी झाली आहेत. गहू पीक डाळिंबाची झाडे भुई सपाट झाली. आंब्याचा मोहर गळून पडल्याने बागायतदार हवालदिल झाले आहेत. गव्हाची प्रत खालावणार असल्याने शेतकर्यांचे मोठे आर्थिक गणित कोलमडले आहे. नुकसानीचे गांभीर्य लक्षात घेता महसूल विभागाने तातडीने पंचनामे करावेत अशा सूचना संबंधित अधिकार्यांना देण्यात आले.

पाहणीदरम्यान आमदार देशमुख म्हणाले की, पडलेल्या गारांचा आकार मोठा असल्याने द्राक्ष व डाळिंबाच्या बागांचे प्रचंड नुकसान झाले असून अनेक बागा पूर्णतः उद्ध्वस्त झाल्या आहेत. या भागात डाळिंब व द्राक्ष लागवड मोठ्या प्रमाणात असून, प्राथमिक अंदाजानुसार या अवकाळी पावसामुळे शेतकर्यांचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान झाले आहे. डाळिंबासोबतच मका पिकालाही म ोठा फटका बसला आहे.

जुनोनी चे पोपट तंडे यांचे तर आंब्याचे झाडावरचे आंबे खाली गळून पडले होते. अंकुश होनमाने यांच्या डाळिंबाच्या बागावर वेगवेगळ्या प्रकारचे डाग पडून डाळिंब खाली पडून डाळिंबाचे मोठे नुकसान झाले. दत्ता होनमाने यांच्याही डाळिंबाच्या बागेची नुकसान झाले. बापू देशमुख, दत्तू देशमुख, दत्ता माने यांचा गहू संपूर्ण भुई सपाट होऊन मोठे नुकसान झाले आहे असल्याचे दिसून आले. काढणीला आलेल्या ज्वारीवरही पाणी फिरल्याने जनावरांच्या चार्याचा प्रश्न गंभीर होण्याची भीती व्यक्त होत आहे. यावेळी कोळा जिल्हा परिषद गटाचे सदस्य किरण भाऊ पांढरे,पंचायत समिती सदस्य अमृत पाटील, सोपान कोळेकर ,सरपंच राजू पाटील, पत्रकार जगदीश कुलकर्णी यांच्यासह नेतेमंडळी शेतकरी वर्ग पदाधिकारी उपस्थित होते.

कोट: यावेळी आमदार देशमुख यांनी घटनास्थळावरूनच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, कृषी मंत्री दत्तात्रय (मामा) भरणे आणि सोलापूरचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्याशी दूरध्वनीवरून संपर्क साधून नुकसानीची माहिती दिली व तात्काळ मदतीची मागणी केली. शासनाकडून तत्काळ पंचनामे करण्याचे आदेश देण्यात आले असून, आगामी विधानसभेच्या अधिवेशनात हा प्रश्न मांडून शेतकर्यांना जास्तीत जास्त भरपाई मिळवून देण्यासाठी प्रयत्न करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

# बापगावमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात साजरी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे /प्रतिनिधी : भिवंडी तालुक्यातील बापगाव सायराम नगर फेज वन येथे छत्रपती शिवाजी महाराज,डॉ. बाबासाहेब आंबेडकर, म हात्मा ज्योतिबा फुले यांची संयुक्त जयंती १८/०४/२०२६ रोजी मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी जयंती निमित्ताने सांस्कृतिक कार्यक्रम सादर झाले.त्यात लहान मुलांनी नृत्य, गायन आणि विविध खेळांच्या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते, ज्याला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. यावेळी समाजसेवक गणेश दादा मेहेर यांनी महापुरुषांच्या प्रतिमा असलेल्या आकर्षक ट्रॉफीज देऊन सहभागी झालेल्या मुलांचा उत्साह वाढवला.मंथन मेहेर व कुलदीप काउतकर यांनी गरजू विद्यार्थ्यांना शालेय वस्तूंचे वाटप केले. कार्यक्रम ासाठी बिल्डर उमेश पाटील, हेमंत मेहेर, पंचशील मित्र मंडळाचे पदाधिकारी आणि पोलिस पाटील नरेश गायकवाड व पुण्यावरून आलेले नाना बोदडे सर आणि सोमा बोदडे इतर मान्यवर उपस्थित होते. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अध्यक्ष.प्रताप बोदडे, गणेश गायकवाड, उद्धव काशिंदे, संदेश जाधव, सचिन सावळे, विशाल बोदडे, मयुर गायकवाड, संदेश सावळे, प्रेम काशिंदे, ओमकार भोईर, राकेश पाटील, विक्रम गांगणे, शांताराम जाधव, सूरज काउतकर, निलेश महाले, भालेराव, रविंद्र कुमार, सनी देओल, पाटील ,गांगुर्डे,रोशन उचित,



राजू पाईकराव, विजय पुंडगे, नयन बिजोले, जय गायकवाड या कार्यकर्त्यांनी विशेष म ेहनत घेतली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रताप बोदडे यांनी केले.



**सीक्रेट हार्ट वरप कल्याण या विद्यालयातील नंदिनी शुभांगी अविनाश घनघाव हिने कोणत्याही प्रकारचे क्लास न लावता स्व अभ्यासाने दहावी सीबीएससी बोर्ड मध्ये ९६ टक्के गुण मि ळवून यश प्राप्त केले आहे तिचे सर्वांकडून कौतुक होत आहे.**

# राजेवाडी आणि निरा उजवा कालव्यातील वितरकांना वेळेत पाणी सोडण्यासाठी बैठक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

राजेवाडी : राजेवाडी तलाव आणि निरा उजवा कालव्याच्या काही वितरकांना अद्याप पाणी सोडण्यात आलेले नसल्याने शेतकऱ्यांमध्ये नाराजी निर्माण झाली होती. या समस्येचे निराकरण करण्यासाठी आज आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख यांनी महत्त्वाची बैठक आयोजित केली होती. बैठकीत संबंधित अधिकाऱ्यांना लवकरात लवकर पाणी सोडण्याचे निर्देश देण्यात आले.

निरा उजवा कालवा विभाग (फलटण) अंतर्गत राजेवाडी (म्हसवड) तलाव आणि निरा उजवा कालव्याच्या विविध वितरकांमधून शेतीसाठी पाणीपुरवठा होतो. माण, आटपाडी, सांगोला, माळशिरस



आदी भागातील शेतकऱ्यांना या कालव्यावर अवलंबून राहावे लागते. मात्र, काही वितरकांमधून पाणी अद्याप सोडले नसल्याने उन्हाळी पिकांना पाण्याची टंचाई भासत होती. यामुळे शेतकऱ्यांनी पाणी सोडण्याची मागणी केली होती.

आज झालेल्या बैठकीत आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख,श्री. मोरे साहेब कार्यकारी अभियंता

नीरा उजवा कालवा व राजेवाडी तलाव , फलटण

श्री राजेंद्र धोत्रे साहेब उपविभागीय अधिकारी निरा उजवा कालवा ,पंढरपूर पाटबंधारे विभाग तसेच शेतकरी वर्ग मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. यावेळी बैठकीत चर्चा करताना, ज्या वितरकांना अजूनही पाणी सोडण्यात आलेले नाही, त्यांना तातडीने आणि वेळेत पाणी उपलब्ध करून देण्याचे निर्देश अधिकाऱ्यांना देण्यात आले. पाण्याचे समन्यायी वाटप, अनधिकृत

### अधिकाऱ्यांना लवकरात लवकर पाणी सोडण्याच्या आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख यांच्या सूचना

उपसा रोखणे आणि दुरुस्तीच्या कामांमुळे होणारा विलंब टाळणे यावरही चर्चा करण्यात आली.

यावेळी बोलताना आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख म्हणाले की राजेवाडी तलाव आणि निरा उजवा कालव्याच्या टेल एंड भागातील शेतकऱ्यांना नेहमीच पाणी मिळण्यात अडचणी येतात. आजच्या बैठकीत अधिकाऱ्यांनी लवकर पाणी सोडण्याचे आश्वासन दिले आहे. यामुळे पिकांना जीवदान मिळेल.

यावेळी ज्या ठिकाणी कालव्याच्या देखभाल-दुरुस्तीचे काम चालू आहे ते वेगाने पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत, जेणेकरून पाण्याची गळती आणि अपव्यय टाळता येईल. सदरच्या बैठकीनंतर शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त केले असून, अधिकाऱ्यांनी दिलेल्या आश्वासनानुसार पाणी सोडले जाईल, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. पाणी सोडण्याची प्रक्रिया सुरू झाल्यानंतर शेतकऱ्यांना दिलासा मिळणार असून त्यासाठी त्यांनी आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख यांचे आभार मानले.

## कर्मवीर गणपत दादा मोरे कला वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयालात रोजगार कौशल्य कार्यशाळा

# बलशाली राष्ट्र निर्मिती, समाज स्वास्थ्यासाठी सक्षम युवा पिढीची गरज : डॉ. ज्ञानोबा ढगे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : २१ व्या शतकाशी स्पर्धा करताना आज युवकांना मोठा संघर्ष करावा लागत आहे. या संघर्षातून तो जीवनमूल्य जपत यशस्वी जीवन जगण्याचा प्रयत्न करत असतो. अलीकडच्या काळात जनजीवन हे तणावाने भरलेले असले तरी व्यक्ती समाज राष्ट्र बलशाली निर्माण करण्यासाठी तणावमुक्त सक्षम युवा पिढी निर्माण होणे गरजेचे आहे असे मत डॉ. ज्ञानोबा ढगे यांनी व्यक्त केले.

कर्मवीर गणपत दादा मोरे कला वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालाल निफाड येथे डॉ.एम .आर . जयकर रोजगार कौशल्य कार्यशाळे निमित्त ते बोलत होते. महाविद्यालयात दिनांक १५ एप्रिल ते १८ एप्रिल २०२६ या कालावधीत ही कार्यशाळा आयोजित केली गेली . या कार्यशाळेत अनेक तज्ञांची व्याख्याने संपन्न झाली.




या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. ज्ञानोबा.ढगे हे होते. प्रमुख वक्ते म्हणून डॉ. श्रीमती एस. आर. जाधव यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सध्याच्या स्पर्धात्मक युगात कौशल्याचे महत्व अधोरेखित केले केले. डॉ.आर. डी .शिंदे यांनी करिअरच्या विविध संधी बाबत माहिती देत विद्यार्थ्यांना योग्य दिशा निवडण्याचे महत्त्व पटवून दिले.

प्राध्यापिका बी.बी. ताकाटे यांनी विद्यार्थ्यांच्या आत्मविश्वास वृद्धीसाठी प्रेरणादायी विचार मांडले आणि व्यवहारिक जीवनात कौशल्यांचा कसा उपयोग होतो हे स्पष्ट केले.

या कार्यशाळेसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एन .शिंदे यांचे मार्गदर्शन लाभले.

या कार्यक्रमाचे समन्वय क डॉ.रवींद्र अहिरे व डॉ. बी.सी .आहेर यांनी संपूर्ण कार्यक्रमाचे उत्कृष्ट नियोजन केले. या कार्यशाळेमध्ये विविध उपक्रमांचे देखील आयोजन करण्यात आले.

यामध्ये गटचर्चा मॉक इंटरव्यू सादरीकरण कौशल्य आणि करिअर मार्गदर्शन सत्रांचा समावेश होता. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राध्यापिका श्रीमती यू.डी. जाधव यांनी केले तर आभार प्राध्यापक समाधान वायकंडे यांनी केले.

या कार्यशाळेस प्रा. अतुल आहेर प्रा. निकेतन महाले प्रा. डॉ. प्रवीण ढेपले प्रा. डॉ. महेश बनकर प्रा.अविनाश पिंपरकर आदी प्राध्यापकवृंद व विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# युवा भिम सेनेच्या मराठवाडा अध्यक्षपदी सुनिल दांडगे तर लातूर तालुका अध्यक्षपदी स्वप्नील कदम यांची निवड




दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क.

लातूर प्रतिनिधी/ सुधाकर रणदिवे : युवा भिम सेनेच्या वार्षिक आढावा बैठकीत मराठवाडा अध्यक्ष म्हणून सुनिल दांडगे यांची तर लातूर तालुका अध्यक्ष म्हणून स्वप्नील कदम यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.यावेळी संस्थापक अध्यक्ष पंकज भाऊ काटे, संस्थापक सचिव राहुल लांडगे, प्रदेश सल्लागार मार्शल माने यांच्या प्रमुख उपस्थितीत ही निवड प्रक्रिया पुर्ण करण्यात आली.

यावेळी प्रदेश प्रवक्ते सुफी सय्यद शमशोद्दीन, पंचायत समिती सदस्य पंकज गायकवाड, महेबुब भाई सय्यद,आश्रुबा कांबळे, अमोल जाकते, तनिष्क काटे, शेखर कांबळे, महेंद्र मोरे, अजय कांबळे, सविता निकम, सुमेध गोरसे, रोहन रायभोळे, बाळू गाडे, अभि मांदळे, पंकज चव्हाण, रत्नदीप रायभोळे गणेश पोटभरे, शिरीष मांदळे, रोहित धावारे, गौतम कसबे, आजम मुजावर,गौरव कांबळे,अनिकेत वाघमारे,इत्यादी पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते.

# आषाढी यात्रेत पालखी मार्गावरील वारकऱ्यांना सुविधा देण्यासाठी दक्ष रहा

## सिईओ कुशल जैन यांनी केली पालखी मार्गाची पाहणी







**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : आषाढी यात्रेत पालखी मार्गावरील वारकरी यांना सुविधा देणे साठी दक्ष रहा. आषाढी यात्रेची तयारी आता पासून सुरू करा. अशा सुचना सोलापूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन यांनी आज दिल्या.

सोलापूर जिल्ह्यातील माळशिरस व पंढरपूर तालुक्यातील संत श्री.संत ज्ञानेश्वर महाराज व श्री संत तुकाराम महाराज पालखी मार्गावरील धर्मपुरी, खुडूस , कारूंडे, सदाशिवनगर, पुरंदावडे, वेळापूर वाखरी, भंडीशेगाव तर संत तुकाराम महाराज पालखी मार्गावरील पिराची कुरोली, महाळुंग, बोरगाव, अकलूज, माळीनगर या पालखी मार्गाची व पालखी तळाची पाहणी आज सोलापूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन यांनी केली. या दौरात अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिणकर, उप मुख्य कार्यकारी अधिकारी स्मिता पाटील, पंढरपूर चे गटविकास अधिकारी अमोल जाधव , माळशिरस पंचायत समिती गटविकास अधिकारी रघुनाथ पांढरे, जिल्हा कक्षातील वैभव आहाळे उप अभियंता बांधकाम, उप अभियंता पाणी पुरवठा, विस्तार अधिकारी, सरपंच , पंचायत अधिकारी उपस्थित होते.

वाखरी पालखी तळा पासून पाहणी ची सुरूवात करून धर्मपुरी पर्यंत वारकरी यांना देणेत येणारे सुविधांचाही माहिती जाणून घेतली. त्यानंतर संत तुकाराम पालखी मार्गावरील पालखी तळाची पाहणी केली. एका दिवसात दोन पालखी मार्गावरील मुक्कामी व विश्रांतीची ठिकाणावरील पिण्याच्या पाण्याच्या सुविधा, मुख्यमंत्री वारकरी निवारा कक्ष,रस्ते, शौचालय व स्नानगृह सुविधासाठी ची जागा, पालखी तळाची स्वच्छता, पिण्याच्या पाण्याचे स्त्रोत या बाबत ची माहिती घेऊन त्या संबंधित अधिकारी व कर्मचारी यांना आतापासून सुविधांची तयारी करणेचे सुचना सिईओ जैन यांनी दिल्या.

सिईओ कुशल जैन यांनी पायी फिरून सर्व पालखी मुक्कामाची ठिकाणे व विश्रांती ची ठिकाणांची पाहणी केली. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिणकर यांनी पालखी मार्गावर वारकरी यांचे साठी निवारा केंद्र, स्वागत कमानी, मुख्यमंत्री वारकरी निवारा कक्षातील सुविधांचाही माहिती दिली. उप मुख्य कार्यकारी अधिकारी अमोल जाधव यांनी वारकरी यांचे साठी देणेत येणारी मोबाईल टॉयलेट ( स्वच्छतागृह सुविधा) स्नानगृह, पालखी तळावरील मुक्कामाची सुविधांची माहिती दिली.

**यंदाची आषाढी यात्रा हायटेक राहणार– सिईओ कुशल जैन..!**

पालखी मार्गावर वारकरी यांना सुविधा देण्यासाठी संवाद यंत्रणा अती जलद राहिल याची दक्षता घेणेत येत आहे. मुख्यमंत्री वारकरी निवारा कक्षात गतवर्षी चांगल्या सुविधा दिल्यामुळे वारकरी यांचे होणारी संभाव्य गर्दी लक्षात घेऊन काळजी घेणेत येत आहे. माहिती तंत्रज्ञानाचा उपयोग वारकरी यांचे साठी करणेत येणार आहे. वारकरी यांचे सेवेसाठी जिल्हा परिषदेचे कर्मचारी यांचे बरोबरच राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक यांची देखील मदत घेणेत येणार आहे.

यात्रपुर्वी यंत्रणेत पडणारा ताण कमी करणेसाठी आता पासून नियोजन व त्यांची प्रभावी अंमलबजावणी करणेसाठी नियोजन करणेत येत आहे.

## राजमाता जिजामाता उद्यानाचे उद्‌घाटन बेकायदेशीर; डॉ. प्रणिता भालके आक्रमक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**




पंढरपूर/प्रतिनिधी : राजमाता जिजाऊ उद्यानाच्या उद्धाटन बेकायदेशीर रित्या झाल्या आहे . याबाबत आपण शहर पोलीस ठाण्यात तक्रार केली आहे. भारत नाना असते तर तुम्ही आमदार झालेच नसता. महिलांना अश्लील भाषा बोलणे ही अवताडे कुटुंबीयांची संस्कार आहेत का, असाही आरोप नगराध्यक्ष डॉ. प्रणिता भालके यांनी पत्रकार परिषदेमध्ये आरोप केला आहे.

पंढरपूर शहराच्या सौंदर्यामध्ये भर पडावी व लहान मुलांना खेळण्यासाठी व जेष्ठ नागरिकांना निसर्ग रम्य वातावरणामध्ये फिरण्यासाठी, नगरपरिषदेने राजमाता जिजामाता उद्यान केले आहे. याचे घाई गडबडीने बेकायदेशीर उद्धाटन करण्यात आले. याबाबत आपण पंढरपूर शहर पोलीस ठाण्यात तक्रार केली आहे. असे डॉ. प्रणियांनीलके यांनी पत्रकार परिषदेमध्ये सांगितले.

राजमाता जिजाऊ उद्यानाच्या उद्धाटन प्रसंगी आमदार अवताडे यांनी डॉ. प्रणिता भालके यांच्यावर टीका केली या टीकेला उत्तर देण्यासाठी त्यांनी पत्रकार परिषद घेऊन आपले आक्रमक पवित्रा आजी व माजी आमदारांना त्यांनी दाखवलेला आहे. त्यांनी पत्रकार परिषदेचे आयोजन केले होते व त्यामध्ये त्यांनी ही सविस्तर माहिती सांगितली आहे.

आपण याची तक्रार महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री यांच्याकडेही करणार आहे. एका महिलेचा अपमान आमदार समाधान आवताडे यांनी केलेला आहे. आपण महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे जे तक्रार करणार असल्याचे सांगितले.

उद्यानामध्ये अनेक गैरसोय आहेत. घाईघाईने उद्यानाचे उद्धाटन करण्यात आले आहे. उद्यानामध्ये लहान मुलांना पिण्याची पाण्याची सोय नाही, महिलांसाठी स्वच्छालय यांची सोय करण्यात आलेली नाही. त्यामध्ये सर्व सुख सोयी उपलब्ध करून घेणे महत्त्वाचे होते. असे डॉ. प्रणिता भालके यांनी सांगितले.

## मौजे भिवरी येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात साजरी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



पुरंदर प्रतिनिधी/डॉ. विनायक गायकवाड : पुरंदर ::भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती मौजे भिवरी येथे मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी भीमसैनिकांकडून एकच साहेब बाबासाहेब.. राज्यघटनेचे शिल्पकार डॉ बाबासाहेब आंबेडकर, जयभीमच्या नाऱ्याने भिवरी परिसर दणाणून सोडला होता.

दि.१४/४/२०२६ रोजी ग्रामदैवत भिवरीची यात्रा असल्याने सामाजिक सलोखा म्हणून त्या दिवशी जयंती साजरी न करता अखिल पंचशील तरुण मंडळाने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक सासवड ते बौद्ध विहार भिवरी अशी पायी ज्योत आणली होती.

शनिवार दि. १८ /४/२०२६ रोजी महामानवाची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. मिरवणुकीची सुरुवात सरपंच मोनाली कटके यांच्या हस्ते पूजन करुन सुरवात करण्यात आली.

यावेळी त्रिशरण पंचशील व धम्म वंदना घेण्यात आली. यावेळी राहुल कटके, प्रकाश कटके, बाळासाहेब गायकवाड आदी मान्यवर उपस्थित होते.

सर्व महापुरुषांच्या प्रतिमेसह महामानवाच्या प्रतिमेची विशेप सजावट करुन भव्य मिरवणूक काढण्यात आली. यावेळी फटाक्यांची आतषबाजी करण्यात आली. यावेळी विविध भीम गीतांवर तालावर जयघोप करण्यात आला. सर्वांना अन्नदान करुन जयंतीची सांगता करण्यात आली.

जयंती महोत्सवाचे यशस्वी आयोजन आखिल पंचशील मित्र मंडळाचे आधारस्तंभ अनिल गायकवाड, अध्यक्ष श्रीधर गायकवाड, कैलास गायकवाड, विठ्ठल गायकवाड, केरबा शेलार, मेघराज शेलार, कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले.

## देवस्थान इनाम जमिनींबाबत येत्या अधिवेशनात कायदा : महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**


मुंबई : देवस्थान इनाम जमिनींचा प्रलंबित प्रश्न मार्गी लावण्यासाठी राज्य सरकार विधिमंडळाच्या येणाऱ्या अधिवेशनात कायदा करणार आहे. याबवतची तयारी सुरू झाली असून, नागरिकांनी आपल्या हरकती व सूचना नोंदविण्यासाठी कायद्याचा मसुदा लवकरच संकेतस्थळावर प्रसिद्ध केला जाईल, असे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी मंगळवारी सांगितले.

रत्नागिरी जिल्ह्यातील चिपळूण तालुक्यातील ऐतिहासिक पेढे परशुराम देवस्थानच्या इनामी जमिनींचा प्रलंबित प्रश्न मार्गी लावण्यासंदर्भात महसूलमंत्र्यांच्या दालनात झालेल्या बैठकीत त्यांनी ही माहिती दिली. बैठकीला आमदार शेखर निकम, रत्नागिरीचे जिल्हाधिकारी मनुज जिंदाल आणि महसूल विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. देवस्थान जमिनींबाबत कायम स्वरूपी तोडगा काढण्यासाठी सरकार सकारात्मक आहे. नवीन कायद्याची प्रक्रिया राबवताना लोकभावना आणि तांत्रिक बाबींचा विचार केला जाणार आहे. सर्वसामान्य नागरिकांना आणि संबंधित पक्षकारांना आपली मते मांडता यावीत, यासाठी ही माहिती ऑनलाइन उपलब्ध करून दिली जाणार असल्याचे मंत्र्यांनी स्पष्ट केले.

कोकणातील फळबागायतदारांसाठीही या बैठकीत एक दिलासादायक निर्णय घेण्यात आला. फळबागांचे पीकपाणी नोंद दरवर्षी करण्याऐवजी ते दर तीन वर्षांनी करण्यात यावी, यासाठी जमाबंदी विभाग व फलोत्पादन विभागाने संयुक्त प्रस्ताव सादर करावा, अशा सूचना महसूलमंत्र्यांनी दिल्या आहेत. यामुळे शेतकऱ्यांचा दरवर्षीचा प्रशासकीय त्रास कमी होण्याची शक्यता आहे. जिल्ह्यातील रोपवाटिका चालकांसाठी माती उपलब्ध करून देताना त्यावर कोणतीही रॉयल्टी आकारली जाऊ नये, असा प्रस्ताव सादर करण्याचे आदेश महसूलमंत्र्यांनी रत्नागिरी जिल्हाधिकाऱ्यांना दिले आहेत.

## पंढरीत श्री परशुराम जन्मोत्सव उत्साहात साजरा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



पंढरपूर (प्रतिनिधी) : येथील मध्यवर्ती ब्राह्मण संघ व श्री परशुराम सर्पमित्र मंडळ यांचे वतीने श्री परशुराम जन्मोत्सव मोठ्या उत्साहात व शोभायात्रेने साजरा करण्यात आला.

दिनांक १९ रोजी जन्मोत्सव निमित्ताने श्री व सौ नितीन कुलकर्णी सर या उभयतांच्या हस्ते श्री स अभिषेक व पुजा करण्यात आली व दिनांक २० रोजी पंढरपूर मंगळवेढा मतदार संघाचे आमदार समाधान आवताडे व माजी आमदार, मार्गदर्शक प्रशांत परिचारक यांचे हस्ते पुजन करण्यात आले. या प्रसंगी आमदार समाधान आवताडे

बोलताना म्हणाले की जन्मोत्सवच्या माध्यमातून मंडळाने समाज प्रबोधन कार्यक्रम हाती घेवून समाजाबरोबरच शहर विकासाचा पाया ब्राह्मण समाज ठरेल असे कार्य भविष्यात हाती घ्यावेत.

त्याचा समाजाला चांगलाच फायदा होईल.या वेळी प्रशांत परिचारक यांनी मार्गदर्शक पर विचार मांडले.या वेळी युवा नेते प्रणव परिचारक,नगरसेवक ओंकार जोशी नगरसेवक, भागवतमहाजन नगरसेवक, सौरभ थिटे नगरसेविका सौ मनिषा धनंजय देशपांडे डॉ सुरेंद्र काणे श्रीकांत महाराज हरिदास व ब्रम्हानंद मंडळी व समाज बांधव भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

त्या नंतर पंढरपूर शहरातून श्री भगवान परशुराम यांच्या मुर्तीची शोभायात्रा मोठ्या उत्साहात काढण्यात आली. यावेळी मार्गावर विविध समाज बांधव व भगिनींनी आपापल्या दुकानांसमोर व घरा पुढे सडा रांगोळीने स्वागत व सर्व समाज बांधवांना पाणी, सरबताचे वाटप करण्यात आले.

सदर शोभायात्रे मध्ये शहरासह उपनगरामधील समाज बांधव भगिनी उपस्थित होते. हा कार्यक्रम यशस्वी करण्यात साठी ओंकार वाटाणे, वैभव कुंभारे , गणेश कुलकर्णी, मंदार जोशी , आनंद तेंडुलकर , उमेश टोमके ,गणेश लंके , श्रीराम बडवे , अमित शिरगावकर , महेश आराध्ये,श्रीराम बेणारे , महेश काळे आणि ब्राह्मण समाज यांनी विशेष परिश्रम घेतले.

**नियमितीकरणाची संधी दवडू नका; प्रांताधिकारी डॉ. मंगरुळे यांचे आवाहन**

# निफाडमध्ये निवासी अतिक्रमणे नियमित करण्यासाठी मोहीम सुरू

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड : प्रतिनिधी : महसूल व वन विभागाच्या दि. २५ मार्च २०२६ च्या शासन निर्णयानुसार शासकीय जमिनीवरील निवासी अतिक्रमणे नियमानुकूल करण्यासाठी निफाड तालुक्यात विशेष मोहीम सुरू करण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर प्रांताधिकारी डॉ. शशिकांत मंगरुळे यांच्या अध्यक्षतेखाली दि २२ एप्रिल बुधवार रोजी ऑनलाईन बैठक घेण्यात आली.

या बैठकीस तहसिलदार विशाल नाईकवाडे, गटविकास अधिकारी नम्रता जगताप, मुख्याधिकारी किरण देशमुख, श्रिया देवचक्के, धिरज भामरे तसेच उपअधीक्षक भूमी अभिलेख राजेंद्र भाबड उपस्थित होते. बैठकीत संबंधित अधिकाऱ्यांना शासन निर्णयाची सविस्तर माहिती देत, अंमलबजावणीबाबत आवश्यक सूचना करण्यात आल्या.

शासनाच्या निकषांनुसार दिनांक ०१ जानेवारी २०११ पूर्वीची व सध्या अस्तित्वात असलेली निवासी अतिक्रमणेच नियमित केली जाणार आहेत. ही जागा केवळ स्व–राहण्यासाठी वापरलेली असावी, असे स्पष्ट करण्यात आले आहे. ५०० चौ. फुटांपर्यंतची अतिक्रमणे विनामूल्य नियमित केली जाणार असून, ५०० ते १५०० चौ. फुटांपर्यंतच्या क्षेत्रासाठी अतिरिक्त भागावर बाजारमूल्याच्या १० टक्के शुल्क आकारले जाणार आहे. १५०० चौ. फुटांपेक्षा जास्त अतिक्रमण मात्र नियमित होणार नाही.

पात्र लाभार्थ्यांनी दिनांक ८ मे २०२६ पर्यंत अर्ज सादर करणे बंधनकारक आहे. ग्रामीण भागातील नागरिकांनी ग्रामसेवकांकडे, तर नगर परिषद व नगर पंचायत क्षेत्रातील नागरिकांनी संबंधित मुख्याधिकाऱ्यांकडे अर्ज करावेत. अर्जासोबत आवश्यक पुरावे आणि कुटुंबाचे संपूर्ण महाराष्ट्रात एकच अतिक्रमण असल्याचे शपथपत्र जोडणे आवश्यक आहे.

नियमित केलेली जमीन पती–पत्नीच्या संयुक्त नावाने 'भोगवटादार वर्ग–२' म्हणून देण्यात येणार असून, ती पुढील पाच वर्षे विक्री किंवा हस्तांतरण करता येणार नाही. गायरान, नदी–नाले, सार्वजनिक रस्ते, स्मशानभूमी, वन जमीन व धोकादायक क्षेत्रांवरील अतिक्रमणे या योजनेत समाविष्ट नसल्याचेही प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

तरी, पात्र नागरिकांनी या योजनेचा लाभ घेण्यासाठी विहित मुदतीत अर्ज सादर करावेत, अन्यथा अनधिकृत अतिक्रमणांवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

## सेवेचा सुवर्ण प्रवास: मंगळवेढ्यात शिक्षण क्षेत्रातील मान्यवरांचा सेवापूर्ती सलमान सोहळा उत्साहात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



पंढरपूर/प्रतिनिधी : गटशिक्षण अधिकारी कार्यालय मंगळवेढा यांच्या वतीने विस्तार अधिकारी व शिक्षण केंद्रप्रमुख यांच्या सेवापूर्ती निमित्त आयोजित सन्मान सोहळा उत्साह पूर्ण वातावरणात संपन्न झाला. शिक्षण क्षेत्रात दीर्घकाळ उल्लेखनीय कार्य केलेल्या मान्यवरांचा गौरव करताना उपस्थितांमध्ये कृतज्ञतेची भावना व्यक्त होत होती.

या सोहळ्यात श्री पु.गे. राठोड, श्री शिवम स.मा. सरगर, श्री च .तू. पाटील, आणि श्री सु . शि. शेजाळ , या केंद्रप्रमुखाचा सेवापूर्ती निमित्त विशेष सन्मान करण्यात आला त्यांच्या शैक्षणिक संवेदनाचा आढावा घेताना व त्यांनी त्यांच्या कार्याचे प्रशंसा करत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांनी दिलेले योगदानचा आढावा घेतला व त्यांनी त्यांच्या कार्याची प्रथम साकारत, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांनी दिलेल्या योगदानाचा गौरव केला व कार्यक्रमाला अध्यक्षस्थानी दिपालीताई ताड होत्या, प्रमुख पाहुणे म्हणून प्राध्यापक शिवाजीराव काळुंगे, सुशील अवताडे, प्रदीप खांडेकर हनुमंत दुधाळ अपूर्ण मताळे, जयश्री शिंदे , जयश्री कौचाळे आदी मान्यवर उपस्थित होते तसेच माझी गटशिक्षणाधिकारी पोपटराव लवटे विष्णू सरगर, हनुमंत कोष्टी बजरंग पांढरे यांच्यासह विविध शिक्षक संघटनेचे पदाधिकारी मंगळवेढा तालुक्यातील शिक्षक बंधू व बहिणी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रास्ताविक दत्तात्रेय एडवे यांनी कार्यक्रमाचा उद्देश स्पष्ट करत संमती सन्माना अर्थींच्या कार्याचा थोडक्यात आढावा घेतला व सूत्रसंचालन संजय दवले यांनी प्रभावीपणे पार पाडली यावेळी डॉक्टर बिभीषण रणदिवे विस्ताराधिकारी शिक्षण अधिकारी यांनी मनोगत व्यक्त करत सेवापूर्ती ही केवळ निवृत्ती नसून नव्या आयुष्याची सुरुवात असल्याची त्यांनी सांगितले.